सोलापूर तरुण भारत


SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

शनिवार, २१ जून २०२५ | ओढ आषाढीची







# आषाढीचे 'हटके' नियोजन

- भाविकांची गैरसोय होणार नाही
- जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केल्या भावना
- वारी पार पाडण्यासाठी ५३६ अधिकारी अन् ४२१२ कर्मचारी वारकऱ्यांच्या सेवेसाठी!



**जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात शासन व प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. केंद्र व राज्य शासन सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध लोककल्याणकारी योजना जाहीर करते व त्या योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याचे काम जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे जोरात चालू असून, याच धर्तीवर आता आषाढीसाठीही त्यांनी सहकारी अधिकाऱ्यांना घेवून मायक्रोप्लॅनिंग केलेला दिसत आहे. सध्या आरडीसी व इतर दोन उपजिल्हाधिकारी ही महत्वाची पदे रिक्त असतानाही त्या पदाचा कार्यभार सांभाळीत आता जिल्हाधिकाऱ्यांवर पंढरीच्या आषाढीचीही मोठी जबाबदारी असल्याने ते कायम व्यस्त असताना दिसून येतात. दरम्यान, आषाढी सोहळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना कसलीही उणीव भासू देणार नाही...असा आत्मविश्वासही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना व्यक्त केला. दरम्यान, ही वारी उत्साही वातावरणात व निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी त्यांच्यासोबत ५३६ अधिकारी अन् ४२१२ कर्मचारी वृंद वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत आहेत.**

सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सुविधा देण्यात येत आहेत. त्यांनी पुढाकार घेतल्यामुळे पालखी मार्गांनी निगडीत १६ रस्ते मंजूर झाले आहेत. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद हेही रात्रंदिन आषाढी वारीसाठी काम करताना दिसत आहेत. त्यांनी प्रत्येकांना कामाचे टप्पे ठरवून देऊन कामाचे सनियंत्रण केले आहे. वारंवार वारीसाठी बैठका घेणे, स्पॉट पाहणी करणे, पालखी मार्गाची पाहणी करून अधिकाऱ्यांना वारंवार सुचना देणे, आषाढी वारी मध्ये सर्व मानांच्या पालख्या व अन्य पालख्या प्रमुख व विश्वस्त यांच्या सूचनेप्रमाणे पालखी मार्ग, पालखी मुक्काम ठिकाण, विसावा ठिकाणी व रिंगण व पंढरपूर शहरात वाखरी येथे आवश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही जिल्हा प्रशासनाची टीम सतत काम करताना दिसत आहे. यावर्षी पाऊस लवकर सुरू झालेला असून पावसाचे प्रमाण अधिक असू शकते त्या दृष्टीने पालखी मार्गावर, तळावर आवश्यक त्या ठिकाणी जलावरोधक मंडप उत्कृष्ट दर्जाचे टाकावेत. शौचालय व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था चांगली करावी. पालखी सोहळा व वारकऱ्यांना या कालावधीत कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही, या दृष्टीने सर्वांनी दिलेली जबाबदारी अत्यंत नियोजनबद्धरित्या पार पाडावी, अशाही सुचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्याने जिल्हाधिकारी अत्यंत दक्षतेने हे काम करताना सध्या दिसत आहेत. श्री. संत ज्ञानेश्वर महाराज, आळंदी, जि. पुणे, श्री. संत तुकाराम महाराज, देहू, जि. पुणे , श्री. संत मुक्ताबाई, मुक्ताबाई, जि. जळगांव, श्री. संत सोपान महाराज, सासवड, जि. पुणे, श्री. संत निवृत्तीनाथ महाराज, त्र्यबकेश्वर, जि. नाशिक, श्री. संत एकनाथ महाराज, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. संत नामदेव महाराज, पंढरपूर, जि. सोलापूर, श्री. विठ्ठल रुखमाई संस्थान, कौंडण्यपूर, जि. अमरावती , श्री. संत चांगावटेश्वर देवस्थान, सासवड, जि. पुणे, श्री. संत निळोबाराय महाराज, पिंपळनेर, जि. अहिल्यानगर या प्रमुख पालख्या सोहळ्या समवेत येणारे भाविक व मार्गावरून समवेत येणारे सर्व दिंड्यांमधील भाविकांची योग्य सुविधा करणेत आलेली आहे. पालखी मार्गावर जिल्ह्यातील एकूण ८१ ग्रामपंचायतीचा सहभाग असून, सदर पालखी मार्गाची लांबी १२० किलोमिटर आहे. मागील वर्षी ७६ वारकरी सुविधा केंद्र होते, यंदाच्या वर्षी १०३ वारकरी सुविधा केंद्र मंजुर करण्यात आलेली आहेत. मागील वर्षी ३१ जलावरोधक मंडप (३,१५,००० स्क्वेफूट) होते व यंदाच्या वर्षी ९४ जलावरोधक मंडप (४,९२,८७५ स्क्वेफूट) व ९ जर्मन हँगर मंडप (२,२०,००० स्क्वेफूट) मंजुर करण्यात आलेले आहेत. सदर पालखी सोहळ्याकरिता ५३६ अधिकारी व ४ हजार २१२ कर्मचारी वृंद यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. जिल्हा परिषदेच्या कृति कार्यक्रमाअंतर्गत १ महिना, १५ दिवस व ८ दिवस अगोदर पाणी स्त्रोतांचे सर्व्हेक्षण व पाणी नमुने तपासणी व फेर तपासणी करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. टँकर व तात्पुरते शौचालय करिता रस्त्यांचे सर्व्हेक्षण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. **(उर्वरित पान २ वर)**



## विभागीय आयुक्तांकडून पालखी मार्ग व तळावरील पाहणी

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील पालखी मुक्कामाची ठिकाणी, विसावा ठिकाणी तसेच पालखी मार्गावर करण्यात आलेल्या कामांची पाहणी केली. तसेच पालखी तळावर आवश्यक त्या ठिकाणी मुरमीकरण, सपाटीकरण याची पाहणी केली. तसेच मुक्काम व विसावा ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पाऊस आल्यानंतर जलावरोधक मंडप कोणत्या ठिकाणी उभे केले जाणार आहेत या अनुषंगाने माहिती घेऊन वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी येणार नाही यासाठी प्रशासनाने काळजी घेण्याबाबत त्यांनी सूचित केले. नातेपुते, सदाशिवनगर, माळशिरस, वेळापूर, भंडीशेगाव, वाखरी, पिराची कुरवडे, बोरगाव, अकलूज सराटी या सर्व पालखी मुक्काम ठिकाणाची पाहणी विभागीय आयुक्त श्री. पुलकुंडवार यांनी केली.




## आसन क्षमतेपेक्षा जास्त जलप्रवासी वाहतूक नाही

आषाढी यात्रा कालावधीत आलेले भाविक चंद्रभागा नदीत नौका विहार करतात. या कालावधीत कोणतीही अनुचित घटना घडू नये तसेच भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व होडी मालकांनी व चालकांनी होड्याची नोंदणी करण्याचे निर्देश दिले आहेत. आषाढी यात्रेच्या अनुषंगाने श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्त निवास पंढरपूर येथे होडी मालक व चालक यांची बैठक आयोजीत करण्यात आली होती. ज्यांनी नोंदणी केली नाही त्या होडी मालकांना व चालकांना चंद्रभागा नदी पात्रात जलप्रवास वाहतुकीसाठी परवनगी दिली जाणार नाही. होड्यांना मिळालेला नोंदणी क्रमांक ठळक अक्षरात लावावा. वारी कालावधी अगोदर आपल्या होडींची दुरुस्ती करुन घ्यावी व वेळोवेळी देखभाल करावी. आपली होडी प्रवासी वाहतुक करण्यासाठी योग्य असल्याची खात्री करुन त्याबाबतचे हमीपत्र द्यावे. योग्य आसन क्षमता प्रवासी व चालक, मालकसहित निश्चित करावी. जलप्रवासी वाहतुकीचे वेळापत्रक निश्चित करावे, सुर्यास्तानंतर जल प्रवासी वाहतुक करु नये. होडीत लाईफ जॅकेटची उपलब्धता ठेवावी. नगर पालिका प्रशासनाने मुबलक प्रमाणात लाईफ जॅकेटची उपलब्धता करुन द्यावी. पाटबंधारे विभागाने भाविकांसाठी होड्यांना जलप्रवासी वाहतुकीची चढण्याची व उतरण्याची ठिकाणे निश्चित करुन द्यावीत. त्या ठिकाणी पाटबंधारे, पोलीस व नगरपालिका विभागाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. जेणेकरुन प्रवासी संख्या देखील आसन क्षमतेनुसार राहिल असेही जिल्हाधिकारी श्री आशिर्वाद यांनी यावेळी सांगितले.

**पुरवणी संयोजक | अविनाश गायकवाड-पाटील**



## श्रध्दा, भक्ती अन् संस्कृतीचा उत्सव

पंढरपूरची आषाढी वारी ही वारकऱ्यांची श्रद्धा, भक्ती आणि संस्कृतीचा उत्सव आहे. या वारीतील प्रत्येक वारकऱ्याचा प्रवास सुखकर, सुरक्षित आणि सुसज्ज व्हावा यासाठी राज्य शासनाने यंदा अधिक व्यापक नियोजन केले आहे. वारीमध्ये यंदा शासनाने आरोग्य सेवा, पाणीपुरवठा, वाहतूक नियोजन, आपत्कालीन व्यवस्था, स्वच्छता मोहीम आणि सुरक्षा यावर विशेष भर दिला आहे. तसेच 'मुख्यमंत्री निवारा सुविधा' ही यंदाच्या वारीतील नवी भर असून, यामार्फत हजारो वारकऱ्यांना विश्रांतीसाठी निवासाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. शासनाच्या विविध विभागांच्या समन्वयातून, स्थानिक प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने ही वारी अधिक सुसंगठित आणि सुरक्षित करण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत. यामुळे यंदाची वारी श्रध्दा, भक्ती अन् संस्कृतीचा उत्सव होणार आहे.

- **जयकुमार गोरे,** पालकमंत्री तथा ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे मंत्री



## आषाढीसाठी ५ हजार २०० विशेष बसेस



आषाढी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत असतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्राकाळात ५ हजार २०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले आहे. यंदा राज्यातील कोणत्याही गावातून ४० अथवा त्या पेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आषाढी एकादशीला राज्यभरातून लाखो भाविक-प्रवाशी पंढरपुरात येतात. अनेक प्रवाशी स्वत:च्या खाजगी वाहनाने, रेल्वेने, एसटीने अथवा विविध पालखींबरोबर चालत दिंडीने येतात या प्रवाशांना एसटीने यंदापासून थेट गाव ते पंढरपूर अशी बस सेवा उपलब्ध करून दिली आहे. या प्रवासात देखील ७५ वर्षावरील ज्येष्ठांना मोफत प्रवास देणारी अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, महिलांसाठी ५० टक्के तिकीट दरात सुट देणारी महिला सन्मान योजना यासारख्या शासनाने दिलेल्या सर्व सवलती लागू राहणार आहेत.

- **प्रताप सरनाईक,** परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष






## नगरविकास विभाग

- पालखीतळ : ३ पालखीतळ व मार्ग व परिसर स्वच्छ करण्यात आले आहेत, विद्युत पुरवठयाची सोय, विदयुत रोषनाई वारीच्या कालावधीत केली जाईल.
- प्रतिबंधात्मक कार्यवाही : पालखीतळ व मार्ग अतिक्रमण काढण्यात आले आहेत व जंतुनाशक फवारणी करण्याचे काम सुरु आहे.
- सोय सुविधा : ३ पालखीतळांवर १५ हिरकणीकक्ष, २०० महिला स्नानगृह, आपत्ती व्यवस्थापन केद्र, १०० मसाज सुविधा, मोबाईल चार्जिग पोईट(ऊर्जारथ), शहरात देण्यात येणा-या सुविधांचे लोकेशन अंतिम करून मॅप तयार करण्याचे काम सुरु आहे.
- ड्रोन व्यवस्था : ३ दिवस मुक्काम ठिकाणी नातेपुते, माळिशरस, अकलूज मुक्कामाच्या ठिकाणी ड्रोन व्यवस्था करण्याचे नियोजित आहे.
- स्वच्छता : कायमस्वरूपी २१२ व पंढपूर येथे १००० कंत्राटी स्वच्छता कर्मचारी नेमणूक करून पालखीचे प्रस्थान झाल्यानंतर गावात झालेल्या कचरा व घाणीचे निर्मुलन करण्यात येईल. ४९२१ कायमस्वरूपी व २००० फिरते शौचालय उपलब्ध आहेत.

## 'राज्य शासन' आम्हा वारकऱ्यांच्या पाठीशी

आषाढी वारी कालावधीत वारकरी भाविकांना आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करण्यासाठी शासनाकडून प्रतिवर्षी सर्वतोपरी प्रयत्न होताना दिसतात. सोलापूरचे पालकमंत्री, जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद आणि पंढरीचे स्थानिक नगरपालिका कर्मचारी वारी काळात रात्रंदिन राबतात. त्यामुळे यंदाही आषाढी वारी स्वच्छ आणि सुंदरच होणार असल्याचा आत्मविश्वास श्रीसंत तुकाराम महाराज यांचे १३ वे वंशज श्रीगुरू कान्होबा महाराज देहूकर यांनी दै. तरूण भारतशी खास संवाद साधताना व्यक्त केला.



दरम्यान, यात्रा कालावधीत आपल्यासाठी राबणाऱ्या जिल्हा प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांशीही सर्व वारकरी बांधवांनी सम न्वयानेच वागण्याची गरज श्रीगुरू कान्होबा महाराजांनी यावेळी प्रतिपादित केली. आषाढी यात्रेसाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासह अन्य संतांच्या पालखी सोहळ्याबरोबर लाखो वारकरी भावीक चालत येतात. वारकरी भाविकांना पालखी मार्ग, तळ या ठिकाणी सुविधा देण्यासाठी शासन आणि स्थानिक जिल्हा प्रशासन प्रतिवर्षी तळमळीने काम करताना दिसते. यामुळे प्रतिवर्षी दिंडी सोहळ्याचे प्रमुखही या अधिकाऱ्यांचे कौतुकच करतात. यंदा वेळेत पाऊस झाल्याने पेरण्या उरकून पंढरीकडे दिंडीतून येण्यासाठी शेतकरी वर्गाची धडपड आहे. यावर्षी आषाढी वारी दरम्यान पावसाची शक्यता हवामान खात्याकडून वर्तविण्यात आल्याने वारकऱ्यांना निवारा शेडचीही तितकीच गरज आहे. त्यांची वारंवार आरोग्य तपासणी, पिण्याच्या पाण्याची तपासणीचीही गरज आहे. इतकेच नाहीतर स्वच्छता राखण्यासाठी फिरते शौचालय, सांडपाणीही मुबलक असावे. अशा माफक अपेक्षा वारकऱ्यांच्या असतात आणि त्याची पूर्तता जिल्हा प्रशासनाकडून प्रतिवर्षी होतेच. या सोयी-सुविधा १०० टक्के मिळाल्यास वारकऱ्यांची कसलीच तक्रार राहत नाही. संतांनी घालून दिलेल्या नियमांची अंमलबजावणी वारीत होत असते. जात-पात, धर्माचे कसलेही बंधन नसते. यामुळे यारे, यारे लहानथोर...असे म्हणत वारकऱ्यांचा मेळा पंढरीकडे येताना दिसतो. एकंदरीत, काया वाचा मने, जीवे सर्वस्वे उदार । बापरखुमादेविवरू विठ्ठलाचा वारीकर ।। असाच वारकऱ्यांचा सुखसोहळ्यात येण्याचा उद्देशही यावेळी श्रीगुरू कान्होबा महाराजांनी शेवटी वर्णन केला.



## ग्रामपंचायत विभाग

- पालखीतळ : पालखीतळ व मार्ग व परिसर स्वच्छ करून घेणे, विद्युत पुरवठयाची सोय, विदयुत रोषनाई केली जात आहे.
- प्रतिबंधात्मक कार्यवाही : पालखीतळ व मार्ग अतिक्रमण काढणे, जंतुनाशक फवारणी पावडर धुरळणी केली जात आहे.
- सोय सुविधा : हिरकणीकक्ष, स्नानगृह ,आपत्ती व्यवस्थापन केद्र, मसाज सुविधा, मोबाईल चार्जिग पॉईट, गावात देण्यात येणा-या सुविधाचे लोकेशन अंतिम करून मॅप तयार करण्यात येत आहे.
- ड्रोन व्यवस्था : ५ दिवस मुक्काम ठिकाणी बोरगांव , वेळापुर, पिराची कुरोली, भंडीशेगाव, वाखरी मुक्कामाच्या ठिकाणी ड्रोन व्यवस्था करण्यात येत आहे.
- स्वच्छता : तात्पुरते स्वच्छता कर्मचारी नेमणूक, पालखीचे प्रस्थान झाल्यानंतर गावात झालेल्या कचरा व घाणीचे निर्मुलन करण्यात येत आहे.

### पाणी व स्वच्छता विभागाकडेही विविध जबाबदाऱ्या

पाणी व स्वच्छता विभागामार्फत आषाढी वारी पालखी सोहळ्यामध्ये १० मानाच्या पालख्यांकरिता ६० ठिकाणी ४३१५ तात्पुरते शौचालयाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. १० शौचालयापाठीमागे (२०० लिटरचे) एक ड्रम याप्रमाणे ४३१५ शौचालयासाठी ४३२ ड्रम निश्चित करण्यात आलेले आहे. मैलगाळ व्यवस्थापनासाठी ५७ सक्शन मशीन, ५७ जेटींग मशीन तयार ठेवण्यात आले आहे. विभागामार्फत १५०० स्वच्छता व साफसफाई स्वंयसेवक नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच तात्पुरते शोचालय व्यवस्थापनासाठी पुरवठादारामार्फत एकावेळी २८३ कर्मचारी, ४२ पर्यवेक्षीय कर्मचारी नेमले जात आहेत. सदर वारीकरिता जिल्हास्तरावरुन ६ अधिकारी वर्ग, ३१ जिल्हास्तरीय कर्मचारी व ८६ विस्तार अधिकारी व ग्रामसेवक असे एकूण १२३ अधिकारी व कर्मचारी नेमले जातात.

### यंदा ४ हजार ३१५ फिरती शौचालये

स्वच्छता व अनुषंगिक सेवा सुविधांकरिता मागील वर्षी फिरते शौचालय ३ हजार ९२५ होते, या वर्षी ४ हजार ३१५ फिरते शौचालय व त्यासाठी ३२५ स्वच्छता सेवकांची नेमणूक व ११४ सक्शन व जेटिंग मशीन तयार ठेवण्यात आले आहे. पाण्याचा विचार केला असता मागील वर्षी २११ पाणी टँकरची व्यवस्था करण्यात आलेली होती. यंदाच्या वर्षी २३४ पाणी टँकर व टँकर भरणेकामी ७९१ स्त्रोत निश्चित करण्यात आलेले आहे. मागच्या वर्षी व १०२ पाणी उदभव स्त्रोत निश्चित करण्यात आले होते.



### जिल्हा परिषदेमार्फत नाविण्यपूर्ण उपक्रम

वारकऱ्यांकरिता गर्दीच्या सनियंत्रणासाठी पालखीतळावर ड्रोनचा वापर, मुक्काम व विसाव्याच्या ठिकाणी ४०० फुट मसाजर तसेच विठ्ठल उर्जा रथ वारकऱ्यासांठी ४ फिरते मोबाईल चार्जिंग सुविधा (१ विठ्ठल उर्जा रथामध्ये १०० चार्जिंग पॉईट) इ. सोई-सुविधा देण्याकरिता नियोजन करण्यात आलेले असल्याची माहिती सीईओ कुलदीप जंगम यांनी दिली.

### पान १ वरुन

पान १ वरुन

१५ दिवस अगोदर पालखी तळ रस्ते सुधारणा व जंतुनाशक फवारणी पावडर धुरळणी करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. ८ दिवस अगोदर स्वच्छते विषयी हॉटेल तपासणी, पाणी स्त्रोतांचे व टँकर भरणा ठिकाणाचे शुध्दीकरण करुन घेण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. ५ दिवस आगोदर हॉटेल कामगारांची वैदयकिय तपासणी , बेटींग व गटार आणि घाण पाण्यावर डस्टींग इ. कामे करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. ३ दिवस आगोदर हॉटेल पाण्याची ओ.टी. तपासणी, स्नान गृह, हिरकणी कक्ष, आपती व्यवस्थापन कक्ष, आरोग्य केंद्र यांची स्थापना करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. मुक्काम व विसाव्याच्या ठिकाणी जलावरोधक मंडप उभा करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. आषाढी वारीच्या एक दिवस अगोदर दिंडी प्रमुखांना औषधोपचार किटचे वाटप करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. पालखीतळ सजावट (रांगोळी, दिशा, दर्शक फलक, विद्युत रोषणाई इ.) करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

### पालखी मार्ग अन् पालखीतळ चकाचक

ग्रामपंचायत विभागामार्फत पालखीतळ, पालखी मार्ग व परिसर स्वच्छ करुन घेणे, विद्युत पुरवठयाची सोय, विदयुत रोषनाई करणे, ५ दिवस मुक्कामाच्या ठिकाणी बोरगांव, वेळापुर, पिराची कुरोली, भंडीशेगाव व वाखरी येथे ड्रोजची व्यवस्था करण्यात आलेली आहे. पालखीतळ व मार्गावरील अतिक्रमण काढणे, जंतूनाशक फवारणी पावडर धुरळणी इ. प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे काम सुरु आहे. तात्पुरते स्वच्छता कर्मचारी नेमणूक करुन पालखीचे प्रस्थान झाल्यानंतर गावात झालेल्या कचरा व घाणीचे निर्मुलन करण्याचे नियोजीत आहे. ग्रामपंचायतीमार्फत हिरकणीकक्ष, स्नानगृह, आपत्ती व्यवस्थापन केंद्र, मसाज सुविधा, मोबाई चार्जिंग पाँईट इ. गावात देण्यात येणाऱ्या सुविधाचे लोकेशन अंतिम करुन मॅप करण्याचे काम सुरु आहे. वारकऱ्यांच्या सोईकरिता दिशा दर्शक फलक १५ फुट उंचीवर लावण्यात आलेले आहेत.

### आरोग्यविषयक घेतली जाणार विशेष काळजी







वारीमध्ये आरोग्य सुविधांबाबत मागील वर्षाकरिता ११ अतिदक्षता विभागाची निवड करण्यात आलेली होती. यंदाच्या वर्षी २१ अतिदक्षता विभाग निवड करुन १२१ आरोग्य दुत (बाईक ऍबुलन्स) वारीकरिता तयार ठेवण्यात आले आहे.

### बांधकाम विभाग

बांधकाम विभागामार्फत ९४ जलावरोधक मंडप (४,९२,८७५ स्क्वेफूट) व ९ जर्मन हँगर मंडप (२,२०,००० स्क्वेफूट) उभारणी करण्याचे काम सुरु आहे. ४१ बाह्य रस्ते व पालखी तळ सुधारणाचे काम सुरु करणेकरिता र. रु. २३०.०० लक्ष व ३० रस्त्याचे व पुल दुरुस्तीचे कामाकरिता र. रु. ३८०.०० लक्ष ग्रामविकास विभागामार्फत मंजुरी देण्यात आलेली आहे. पालखी मार्गावरील ८२ ग्रामपंचायतीतील मुक्काम, विसावा पालखीतळ व मार्ग अतिक्रमण काढण्याचे काम सुरु आहे.

CMYK



# ओढ आषाढीची



तरुण भारत






## मागील वारी वेळेस आलेल्या अडचणी व त्यावरील उपाय योजना

### अडचणी

- टॉयलेट्स व फिडींग पॉईट्स येथे चिखलामुळे अडचणी निर्माण झाल्या होत्या.
- सूचनाफलक कमी उंचीवर असून नीट दिसत नसल्याने संभ्रम निर्माण होत होता.
- सेक्शन व जेटिंग, इलेक्ट्रिकल वॅन यांच्या दळणवळणास अडचणी निर्माण होत होत्या.
- वारीपूर्वी ३० व ८ दिवसांपूर्वी पाण्याच्या स्त्रोतांचे २ वेळा टेस्टिंग होऊनही काही ठिकाणी दूषित पाणीपुरवठा झाला होता.
- सीसीटीव्हींचे प्रमाण कमी होते.
- वारी काळात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत होती.
- शव वाहिकांची संख्या २ होती.
- शिवाजी चौक चौफळापासून ते महाद्वार चौकापर्यंत वाहनांच्या गर्दीमुळे भाविकांना त्रास होत होता.
- होडी चालकांवर नियंत्रण कमी प्रमाणात होते.

### उपाय योजना

- टॉयलेट्स व फिडींग पॉईट्स येथे मुरुमीकरण करून पोच रस्ता निर्माण करण्यात आलेला आहे
- पालखीमार्गावर १४० ठिकाणी सूचना व दिशादर्शक फलक १५ फूट उंचीवर बसवण्यात येणार
- वाहनांना अत्यावश्यक सेवेतील वाहनाचा दर्जा देऊन दळणवळण सुलभ करण्यात आले आहे
- यंदा पाण्याच्या स्त्रोतांचे ३०,१५ व ८ दिवस आधी अशी तीनवेळा टेस्टिंग होणार आहे
- यावेळेस सीसीटीव्हींची संख्या ३५० करण्यात आली आहे
- वाहतूक कोंडी टाळण्यासाठी २.८ कोटींच्या ३० रस्त्यांचे खडीकरण करण्यात आले आहे
- शव वाहिकांची संख्या ५ करण्यात आली आहे
- हे ठिकाण नो वेहिकल झोन म्हणून घोषित करण्यात आले आहे
- यंदा होडी चालक नोंदणीसह प्रवासी क्षमता २०+२ ठरवण्यात आली असून, महिला व लहान
- मुलांसाठी लाईफ जॅकेट बंधनकारक आहे

### नाविण्यपुर्ण उपक्रम

- गर्दीच्या सनियंत्रणासाठी पालखी तळावर ड्रोन, इंटिग्रेटेड कंट्रोल रूम व सीसीटीव्हीचा वापर
- वारक-यांकरिता मुक्काम व विसाव्याच्या ४०० फुट मसाजर
- २ पालखी मार्गावर विठ्ठल ऊर्जा रथ, वारकऱ्यासाठी फिरते मोबाईल चार्जिंग
- सेवा व सुविधा संनियत्रणासाठी २०० वायरलेस लँडलाईन, १०० ठिकाणी वायफाय बुस्टर
- मुक्काम व विसाव्याच्या मार्गात प्रत्येक ३कि.मी. वर वारकरी सुविधा केंद्र
- वारी संपल्यावर वारी मार्ग स्वच्छता
- १२१ आरोग्यदूत व बाईक अँब्युलन्स

## आषाढी यात्रेसाठी येणाऱ्या प्रमुख मानाच्या पालख्या, प्रस्थान व आगमन

| अ.क्र | पालखीचे नाव | पालखी प्रस्थान दिनांक | सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीत आगमन दिनांक | आगमन गावाचे नाव व तालुका |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री संत ज्ञानेश्वर महाराज, आळंदी, जिल्हा- पुणे. | 19/06/2025 | 30/06/2025 | धर्मपुरी, माळशिरस |
| 2 | श्री संत तुकाराम महाराज, देहू, जिल्हा- पुणे. | 18/06/2025 | 01/07/2025 | अकलूज, माळशिरस |
| 3 | श्री संत मुक्ताबाई, मुक्ताईनगर, जिल्हा- जळगाव. | 06/06/2025 | 30/06/2025 | शेंद्रि, बार्शी |
| 4 | श्री संत सोपान महाराज, सासवड, जिल्हा- पुणे. | 23/06/2025 | 01/07/2025 | अकलूज, माळशिरस |
| 5 | श्री संत निवृत्तीनाथ महाराज, त्र्यंबकेश्वर, जिल्हा- नाशिक. | 10/06/2025 | 29/06/2025 | रावगाव, करमाळा |
| 6 | श्री संत एकनाथ महाराज, पैठण, जिल्हा- छत्रपती संभाजीनगर. | 18/06/2025 | 30/06/2025 | मुंगशी, माढा |
| 7 | श्री संत नामदेव महाराज, पंढरपूर. | 05/07/2025 | 06/07/2025 | पंढरपूर |
| 8 | श्री विठ्ठल रूख्माई संस्थान, कौंडण्यपूर, जिल्हा- अमरावती. | 31/05/2025 | 27/06/2025 | पाथरी, बार्शी |
| 9 | श्री संत चांगावटेश्वर देवस्थान, सासवड, जिल्हा- पुणे. | 23/06/2025 | 01/07/2025 | अकलूज, माळशिरस |
| 10 | श्री संत निळोबाराय महाराज, पिंपळनेर, जिल्हा- अहिल्यानगर. | 21/06/2025 | 30/06/2025 | टेंभुर्णी, माढा |

### वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी राज्य पोलीस यंत्रणा सज्ज

आषाढी वारीचा मुख्य सोहळा ६ जुलै रोजी पंढरपूर येथे पार पडणार आहे. यासाठी प्रशासनाने आणि पोलीस यंत्रणांनी जय्यत तयारी केली आहे. वारी सोहळ्यासाठी राज्य पोलीस दलातील ६,००० पोलीस कर्मचारी आणि ३,२०० होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय राज्य राखीव पोलीस दलाच्या सहा तुकड्यांनाही सतर्कतेच्या दृष्टीने तैनात करण्यात आले आहे. संपूर्ण पालखी मार्गावर ड्रोनच्या साहाय्याने देखरेख ठेवण्यात येणार आहे. कोणताही अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलीस प्रशासन सतर्क झाले आहे.





## पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून भक्ती सागर, वाळवंट व पालखी तळांची पाहणी

आषाढी यात्रेच्या अनुषंगाने यात्रा कालावधीत पालखी सोहळ्या सोबत येणाऱ्या वारकरी भाविकांना पालखी तळांवर, भक्ती सागर (६५ एकर), चंद्रभागा वाळवंट येथे उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या सुविधांची पाहणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून करण्यात आली. यावेळी ६५ एकर (भक्ती सागर) येथे पाणी साठणार नाही याची दक्षता घेऊन मुरमीकरण व रोलिंग करावे. सार्वजनिक बांधकाम विभागाने आवश्यक ती तांत्रिक मदत संबंधित यंत्रणेला करावी. तसेच या ठिकाणी वारकरी भाविकांना कायमस्वरूपी सुविधा देण्याबाबत नियोजन करावे करावे. स्वच्छता गृहाची तातडीने दुरुस्ती करून स्वच्छता करावी. चंद्रभागा नदी पत्राच्या कडेला असणारी काटेरी झाडे झुडपे, मातीचे व दगडाचे ढिगारे तात्काळ काढून घ्यावेत. नदीपात्रातील पाणी स्वच्छतेसाठी नगरपरिषदेकडून बसविण्यात आलेल्या सेबर टेक्नॉलॉजी मशीनला तातडीने वीज वितरण कंपनीने विद्युत पुरवठा करण्याचे निर्देश पालकमंत्री गोरे यांनी दिले. तसेच पालकमंत्री श्री.गोरे यांनी वाखरी, बाजीराव विहीर, श्री संत सोपान काका,भंडीशेगाव, पिराची कुरोली, वेळापूर, माळशिरस, नातेपुते, धर्मपुरी येथील पालखी तळांची व रिंगण सोहळ्याच्या ठिकाणची पाहणी केली. यावेळी बाजीराव विहीर (वाखरी) येथे संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली महाराज पालखी सोहळ्याचे गोल रिंगण होते. हा रिंगण सोहळा पाहण्यासाठी वारकरी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी उड्डाणपुलाच्या शेजारी असणारे लोखंडी बॅरिकेटिंग रिंगण सोहळा कालावधीत काढून घेण्याच्या सूचना त्यांनी केल्या. तसेच पालखीतळांवर पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या वारकरी भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधामध्ये पिण्याचे पाणी, शौचालय, स्नानगृह, महिला भाविकांची व्यवस्था आरोग्य सुविधा, सुरक्षा व्यवस्था आदी बाबतची माहिती तसेच सर्वच पालखी तळांवर मुरमीकरण करावे अशा सूचना दिल्या.

### वारकरी भाविकांची होणार राहण्याची सुविधा

आषाढी यात्रेसाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासह अन्य संतांच्या पालखी सोहळ्याबरोबर मोठ्या प्रमाणात वारकरी भावीक चालत येतात. येणाऱ्या वारकरी भाविकांना पालखी मार्ग, तळ या ठिकाणी सुविधा देण्यासाठी निधीची कमतरता भासणार नाही. तसेच या काळात पालखी सोहळ्या व्यतिरिक्त लाखो भाविक पंढरपुरात येतात, अशा सर्व भाविकांच्या राहण्याची व्यवस्था पंढरपूर शहरात करण्यात यावी यासाठी प्रशासनाने तयारी करावी, अशा सूचना ग्रामविकास व पंचायतराज मंत्री मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या आहेत. आषाढी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांना उत्कृष्ट सोयी सुविधा देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. तसेच ही आषाढी वारी स्वच्छतेची वारी होण्यासाठी प्राधान्य दिले जात आहे. यात्रा कालावधीत चंद्रभागा नदीपात्र कायम स्वच्छ राहील यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करण्यात येणार आहे. तसेच वारीपूर्वी पंढरपूर शहरात लोकसहभागातून स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. वारकरी भाविकांना उपलब्ध सुविधा तसेच सूचनांची माहिती देण्याचे फलक किमान १५ फूट उंचीचे लावावेत. नदीपात्रातील होड्यांची नोंद घेऊन होडी मालक व चालक यांचे नाव, आसन क्षमता निश्चित करून होडीत जास्त लोक बसणार नाहीत याची दक्षता घ्यावी. तसेच होडीमध्ये मुबलक प्रमाणात लाईफ जॅकेटची व्यवस्था ठेवली पाहिजे, असेही निर्देश त्यांनी दिले. तसेच शहरातील पार्किंगच्या ठिकाणी मुरमीकरण व रोलिंग करावे. पालखी मार्ग, तळ तसेच पंढरपूर शहरातील अतिक्रमणे काढण्यासाठी पोलीस नगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागाने समन्वय साधून संयुक्तपणे कार्यवाही करावी. वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी पालखी मार्ग तसेच शहरातील रस्त्यावर बंद पडलेली वाहने तात्काळ काढण्याची व्यवस्था पोलीस प्रशासनाने करावी. वाखरी ते पंढरपूर रस्त्याचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तात्काळ पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करावी, अशाही सूचना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या.



वाट पाहे उभा भेटीची आवडी ।
कृपाळू तातडी उतावीळ ।।

# वारकऱ्यांना 'इंधन' पुरवठा करण्यासाठी ११ पथके तैनात

श्री क्षेत्र पंढरपूर येथे आषाढी यात्रा सोहळा हा दि. ०६/०७/२०२५ ते २५/०७/२०२५ या कालावधी मध्ये संपन्न होणार असून, दि. ०६/०७/२०२५ या दिवशी आषाढी एकादशी असल्याने पंढरपूर व परिसरामधील सुमारे १० ते १२ लाख भाविक विठ्ठल दर्शनासाठी येतात. भाविकांचा सदर कालावधीमध्ये या भागामध्ये वास्तव्य असते तरी, भाविकांना यात्रा कालावधीमध्ये आवश्यक असणारे गॅस सिलेंडर व वाहनांसाठी लागणारे पेट्रोल डिझेल/सीएनजी गॅस इत्यादीचा पुरवठा तालुक्यातील सर्व गॅस एजन्सी व पेट्रोल डिझेल/सीनजी गॅस पंप चालक यांनी करणे बाबतचे नियोजन जिल्हा पुरवठा कार्यालयाने केले असून, वारकऱ्यांना वेळेत इंधनाची सोय करण्यासाठी ११ महत्वाची पथके स्थापन केली असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिली.

या पथकाचे अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या जबाबदाऱ्या जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनानुसार वाटून दिल्या असून, जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यावर नियंत्रण ठेवणार आहेत. ही पथके भाविकांना यात्रा कालावधीमध्ये आवश्यक असणारे गॅस सिलेंडर व वाहनांसाठी लागणारे पेट्रोल, डिझेल/सीएनजी गॅस इत्यादीचा पुरवठा बाबत नेमून दिलेले कामकाज बिनचूक पार पाडणार आहेत. पथकाच्या कामाचे पर्यवेक्षण करणेकामी म हसूलचे बालाजी पुदलवाड (निवासी नायब तहसीलदार, पंढरपूर) यांची नेमणूक केली आहे. तर त्यांनी जिल्हा पुरवठा कार्यालयास दैनंदिन रिपोर्टिंग करणे व समन्वय करणे गरजचे आहे. तर या कामासाठी पुरवठा निरीक्षक कुंभार यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे.




### यात्रा कालावधीतील वाहतूक व साठा

यात्रा कालावधीमध्ये आवश्यक असणारे गॅस सिलेंडर व वाहनांसाठी लागणारे पेट्रोल, डिझेल/सीएनजी गॅसची वाहतूक व वितरण योग्य पद्धतीने व्हावे व मागणीनुसार तात्काळ उपलब्ध करून देणे बाबतच्या सूचना कंपनीचे विक्री अधिकारी यांचे कडून व संबधित गॅस व पंप चालक यांना देण्यात आलेल्या आहेत. या कालावधीत गॅस, पेट्रोल डिझेल/सीएनजी चा १०% साठा आतिरिक्त राखीव कोटा म्हणून शिल्लक ठेवण्यात येणार आहे.

### यात्रा काळात तांत्रिक सुरक्षेवरही राहणार नजर

यात्रा कालावधीमध्ये भाविकांच्या मुक्कामाच्या ठिकाणी व पंढरपूर शहरांमध्ये गॅस सिलेंडर मधून वायु गळती होवून स्फोट होणार नाही यांची दक्षता घेण्यासाठी ४ मेकॅनिक / तांत्रिक कर्मचारी यांची पथकात नेमणूक करण्यात आलेली आहे.

## १९० हिरकणी कक्षांची स्थापना

महिला वारकऱ्यांकरिता मागील वर्षी ११०० स्नानगृह व ९१ हिकरणी कक्ष स्थापन करण्यात आले होते. यंदाच्या वर्षी १८२४ महिला स्नान गृह व ११० हिरकणी कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. महिला व बाल विकास विभागामार्फत ११० हिकरणी कक्ष, महिलासाठी बेड, सॅनिटरी पॅड व्हेंडींग डिस्पोजर मशीर, लाईट, पंखे, मेंट, खुर्ची, स्वच्छ पिण्याचे पाणी, कमरापेटी, स्तनदा मातांसाठी गोपनीय कक्ष या करिता ४७६ अधिकारी आणि कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.



## राज्य सरकारचा वारकऱ्यांसाठी 'चरणसेवा' अभिनव उपक्रम

पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या लाखो वारकऱ्यांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातर्फे 'चरणसेवा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. राज्यातील नाशिक, जालना, सातारा, सोलापूर आणि पुणे या पाच जिल्ह्यांतून निघणाऱ्या पालख्यांमध्ये सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, उपचार आणि 'चरणसेवा' करण्यासाठी सुमारे पाच हजार वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या उपक्रमात वैद्यकीय अधिकारी, फिजिओथेरपिस्ट, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी तसेच स्वयंसेवक यांचा समावेश आहे. वारकऱ्यांच्या दिंडीसाठी एकूण ४३ ठिकाणी मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे. या मुक्कामाच्या ठिकाणीच 'चरणसेवा' दिली जात असून, तेथे सुसज्ज वैद्यकीय तपासणी केंद्रे उभारण्यात आली आहेत. तसेच, दिंडी मार्गावरील स्थानिक आरोग्य विभाग, जिल्हा प्रशासन, स्वयंसेवी संस्था तसेच शासकीय व खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांच्या समन्वयाने ही सेवा दिली जात आहे.

## महिला व बाल विकास विभाग

- ५९८ अधिकारी व कर्मचारी
- स्तनदा मातांसाठी
- गोपनीय कक्ष
- कचरापेटी
- स्वच्छ पिण्याचे पाणी
- १५५ हिरकणी कक्ष
- महिलांसाठी बेड
- सॅनिटरी पॅड व्हेंडींग मशीन,
- डिस्पोजर मशीन
- लाईट, पंखे, मॅट, खुर्ची,

## पालकमंत्र्यांच्या संकल्पनेतून राबणार महास्वच्छता अभियान

आषाढी यात्रा २०२५ च्या अनुषंगाने पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या संकल्पनेनुसार व निर्देशानुसार पंढरपूर शहरात आषाढी वारी २०२५ च्या अनुषंगाने पूर्वतयारी म्हणून रविवार, दि. २२ जूनरोजी महास्वच्छता अभियान राबवले जाणार आहे. सदर महास्वच्छता अभियान रविवारी सकाळी ७ ते १० या कालावधीत राबवले जाणार असून, त्याकरिता पंढरपूर शहरातील ४२ ठिकाणे निश्चित करण्यात आली आ-हेत. सदर महास्वच्छता अभियानास सकाळी सात वाजता प्रत्येक पथकाने नेमून दिलेल्या ठिकाणी सुरवात करायची असून, सात ते दहा या वेळेत आपले काम पूर्ण करायचे आहे.काम पूर्ण झाल्यानंतर सदर अभियानाची सांगता छत्रपती शिवाजी महाराज चौक, पंढरपूर येथे होणार आहे. या अभियानामध्ये पालकमंत्री गोरे यांच्यासह १५०० स्वयंसेवक तसेच प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहभाग राहणार आहे.



## ज्या सुखाकारणे देव वेडावला। वैकुंठ सोडुनी संत सदनी राहिला।।

यंदा पाऊसपाणी वेळेवर; दिंड्यातून वारकरी संख्या वाढली. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात लवकर पडलेला पाऊस, वेळेवर झालेल्या पेरण्या यामुळे शेतीमधील कामे लवकर उरकल्याने यावर्षी राज्यातील वारकऱ्यांनी समाधानाने संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीला हजेरी लावल्याचे दिसून आले. आषाढी वारीमध्ये मोठ्या प्रमाणात शेतकरी कुटुंबातील वारकरी सहभागी होत असतात. विशेषत: मराठवाडा, खानदेशसह संपूर्ण महाराष्ट्रातून हे वारकरी येतात. पाऊस वेळेवर पडला की, शेतकरी शेतीची पेरणी, खुरपणी करून मग वारीत सहभागी होत असतात. यावर्षी जूनच्या सुरुवातीलाच समाधानकारक पाऊस झाल्याने वारकऱ्यांची संख्या श्री तुकोबा आणि माउलींच्या पालखीत वाढली आहे, असे काही वारकऱ्यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना सांगितले. तर या सोहळ्यात मिळणारा आनंद अवघ्या त्रैलोकी नाही; असाही निर्वाळा त्यांनी दिला. या वारकऱ्यांच्या आनंदात सहभागी होण्यासाठी देवसुध्दा वेडावतो. यामुळे ज्या सुखाकारणे देव वेडावला। वैकुंठ सोडुनी संत सदनी राहिला।। या संतोक्तीचा यावेळी आठव होतो.



## आषाढी वारीसाठी राज्य सरकारकडून अनुदान

आषाढी एकादशी यात्रा सोहळा २०२५ करिता मानाच्या १० पालख्यांसोबतच्या १ हजार १०९ दिंड्यांना प्रती दिंडी २० हजार रुपये अनुदान वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत असल्याचा शासन निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जारी केला आहे. गतवर्षी आषाढी एकादशी यात्रा सन २०२४ करिता मानाच्या १० पालख्यांसोबत येणाऱ्या प्रत्येक दिंडीला २० हजार रुपये इतके अनुदान सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत देण्याबाबत प्रशासकीय मान्यता देण्यात आले होते. त्यानुसार २०२३-२४ मध्ये विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडून एकूण १ हजार १०९ दिंड्यांची यादी प्राप्त झाली होती. यावर्षीदेखील दिंड्यांना प्रतिदिंडी २० हजार रुपये याप्रमाणे एकूण २ कोटी २१ लाख ८० हजार रुपये अनुदान वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई येथे बैठक घेऊन पालखी सोहळ्यासाठी वारकऱ्यांना उत्तम सुविधा देण्याचे निर्देश दिले आहेत. उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांनीदेखील आवश्यक सुविधांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही दिली आहे. प्रशासनातर्फे व्यापक स्तरावर नियोजन करण्यात येत आहे.

## स्वच्छ, हरित व सुरक्षित वारी पार पाडा : विभागीय आयुक्त



पालखी सोहळ्यात वारकऱ्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासह मागील पालखी सोहळ्याप्रमाणे सुरक्षित, अपघात मुक्त, स्वच्छ आणि हरित वारी संपन्न करण्यासाठी विभागातील सर्व अधिकाऱ्यांनी सूक्ष्म नियोजनाच्या सुचना विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिल्या आहेत. वारी कालावधीत अन्न शुद्धतेची खात्री करण्यासाठी आवश्यकतेनुसार अन्न व औषध प्रशासनाकडील अधिकारी-कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी आणि येत्या काळात अन्न भेसळ करणाऱ्याविरोधात व्यापक मोहीम राबवावी. पालखी मार्गावर मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करावी. पालखी सोहळ्यादरम्यान आणि नंतरही स्वच्छता रहावी यासाठी आवश्यकतेनुसार स्वच्छतागृहांची संख्या वाढवावी. चंद्रभागेचे पाणी स्वच्छ राहील यासाठी आवश्यक उपाय योजावेत. नीरा नदी परिसर स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे. पालखी पुढे गेल्यावर म ागील गावात त्वरित स्वच्छता करावी. वारकऱ्यांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देतांना रुग्णवाहिकेत पुरेशा प्रमाणात औषधे आणि वैद्यकीय अधिकारी असतील याची दक्षता घ्यावी. पालखी मार्ग खड्डे मुक्त राहतील व उत्तम वाहतूक व्यवस्थापन राहील याची काळजी घ्यावी. पालखी मार्गावर पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा. घाट परिसरात दरड कोसळून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. तिन्ही जिल्ह्यांतील पालखी म ार्गावरील व्यवस्थेबाबत एकत्र पुस्तिका तयार करण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या असल्याने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अगदी नियोजनबध्द वारीची तयारी केली आहे.

